# क्रांती

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**क्रांती : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये २७०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# क्रांती

## दोन शब्द

कारागृहात असताना मी कितीतरी लिहिले. त्यापैकी चौथा हिस्साही बाहेर पडला नाही. नाशिकच्या तुरुंगात थोर सेवक स्वामी आनंद यांनी मला एक झरणी (फाउंटनपेन) दिली होती. बार्डोलीच्या लढ्याचे वेळेस त्या झरणीने महान् पत्रव्यवहार सरकारशी वगैरे केला होता. अशी ती ऐतिहासिक झरणी मला मिळाली व माझ्या हृदयातून उत्साहाचा झरा जणू वाहू लागला. काम करून आल्यावर, सायंकाळी बंद झाल्यावर, मी वही व झरणी घेऊन बसत असे. माझ्या जीवनाच्या सदसत् जीवनसिंधूत मी बुड्या मारीत असे व जे मिळेल ते कागदावर ठेवीत असे. श्यामची आई, पत्रीतील काही कविता, विश्राममधील गोष्टी, धडपडणारी मुले, पुनर्जन्म वगैरे सारे त्यावेळचेच. हा व इतर माझ्या स्वतंत्र रचनेशिवाय भगिनी निवेदिता यांचे अनुवादलेले ग्रंथ, महर्षी टॉलस्टॉय यांच्या 'कला म्हणजे काय' या महान् ग्रंथाचा अनुवाद, थोर ग्रंथकार ॲमील यांच्या अमर दैनंदिनीचा अनुवाद, रवींद्रांची साधना, श्री किशोरलाल भाईंच्या 'केळवळीना पाया'चे भाषांतर वगैरे वह्या पडल्याच आहेत. 'स्वदेशीसमाज' हे रवींद्रांचे निबंध काँग्रेस पत्रांतून प्रसिद्ध केले. परंतु बाईंडिंग होऊन पुस्तकरूपाने बाहेर यायचेच आहेत. 'ते आपले घर' नाटिका बाहेर आली.

१९३३ मध्ये नाशिक तुरुंगात दीनबंधू बाबू म्हणून एक बृहत्कथा मी लिहिली होती. ७ वर्षांत कितीतरी बदल होतात. दीनबंधूत बदल होऊन त्याची क्रांती आज होत आहे.

धडपडीने पुनर्जन्म झाला. पुनर्जन्म म्हणजे जीवनात क्रांती. पुनर्जन्माच्या प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे किलबिल करणे हाही एक माझा स्वभाव आहे. लिहिणे हा माझ्या पंचप्राणातील एक प्राण आहे. मराठी सारस्वताची इतर गोष्टी सांभाळून मी उपासना करू पाहत असतो. वेळ मिळाला तर काही लिहावे, सुंदर परभाषेतील ग्रंथ वाचला तर त्याचा अनुवाद करून ठेवावा, असे तुरुंगात वा बाहेर चालते. अप्रकाशित

वह्या मरताना इतिहास संशोधक मंडळाच्या ते घेईल तर स्वाधीन कराव्या असे ठरविले आहे. मराठी भाषेच्या वाग्देवतेसमोर महान् पूजक मोलाची पूजा आणतील, परंतु मी आणणार साधी पत्री. थोर कलावान तेथे मधूर आलाप घेतील, परंतु माझी साधी चिवचिव. तानसेन अमर तान घेतो. परंतु, चिमण्या आपापल्या किलबिलीत रंगलेल्या असतातच. असो.

सदाशिव, पुणे-२ **साने गुरुजी**
दि. २६/२/१९४०

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | कोठे गेले ते बाबा? .......... | ९ |
| २. | दत्तविधान .......... | २४ |
| ३. | मुकुंदराव .......... | ३१ |
| ४. | दिवाळी .......... | ३९ |
| ५. | प्रयाण .......... | ५३ |
| ६. | विश्वभारती .......... | ६१ |
| ७. | मुकुंदरावांची तीर्थयात्रा .......... | ७१ |
| ८. | शांता, तू शीक .......... | ८२ |
| ९. | प्रद्योत .......... | ८८ |
| १०. | येईल, एक दिवस येईल .......... | ९६ |
| ११. | मोहनाशन मोहन .......... | १०३ |
| १२. | रडू नका उठा .......... | ११४ |
| १३. | स्वातंत्र्य-दिन .......... | १२१ |
| १४. | महापूर .......... | १३३ |
| १५. | घरची तार .......... | १४८ |
| १६. | पित्याची इच्छा पूर्ण केली .......... | १५५ |
| १७. | दीनबंधू .......... | १६२ |

१८. शांतेचा संसार .......... १७०
१९. माया .......... १८२
२०. विद्यार्थी-संघ .......... १९२
२१. अमर दिवस .......... २००
२२. रामदासला अटक .......... २११
२३. अमर रात्र .......... २१९
२४. तू माझा भाऊ हो .......... २२८
२५. कामगारांचा संप .......... २४१
२६. सुटका .......... २४९
२७. हिंसा-अहिंसा .......... २५७
२८. चिर-मिलन .......... २६५
२९. भविष्यवाणी .......... २७०

✦✦✦

# कोठे गेले ते बाबा?

तिला कोणी मीना म्हणत, मिनी म्हणत.

श्रीमंत बापाची एकुलती एक ती मुलगी. तिची आई लहानपणीच निवर्तलेली. श्रीनिवासरावांनी पुन्हा लग्न केले नाही. गडगंज संपत्ती होती. आजूबाजूचे टोळभैरव सांगावयाचे, ''तुम्ही पुन्हा लग्न करा. एवढ्या इस्टेटीचा मालक कोण?'' ''तिची विल्हेवाट लावली जावी असं तुम्हाला वाटतं? लग्न करण्याचं अद्याप वय आहे आणि आपल्या देशात पैसे असले म्हणजे वाटेल त्या वयात नवी नवरी मिळू शकते.'' परंतु, श्रीनिवासराव गंभीर राहत.

''लग्न एकदाच लागत असतं. पुन: पुन्हा लग्न लावणाऱ्यांना लग्नाचा गंभीरपणा, पवित्रपणा समजत नाही असे मला वाटतं.'' ते म्हणत.

''ज्या मुलामुलींची लहानपणीच लग्नं लागली, ज्यांनी संसार काय ते अनुभवले नाही, लग्न काय ज्यांना कळले नाही, त्यांच्यातील जर कोणी लहानपणीच मेलं तर त्यांनी काय करावयाचं?'' असा एकदा एकाने श्रीनिवासरावांना प्रश्न केला होता. त्या वेळी ते म्हणाले, ''आता अशी लग्नं फार होत नाहीत. परंतु समजा, नवरा लहान असताना त्याची वधू वारली किंवा वधू लहान असताना तिचा पती वारला, तर त्यांची नि:शंकपणे पुन्हा लग्नं लावावीत. वास्तविक ते विवाहच नव्हेत. विवाहातील प्रतिज्ञांचे अर्थ त्यांना कळत होते का? विवाह नव्हते-ती गंमत होती. ती वेड्या आई-बापांची हौस होती. परंतु, ज्यांची लग्नं मोठेपणी झाली किंवा लहानपणी होऊनही जी वधू-वरे वयात राहूनही एकत्र राहिली सवरली, त्यांना माझ्या दृष्टीनं पुन्हा विवाह नाही. पतिपत्नींची परस्परांस ओळख झाली आहे, मूलबाळ झालं आहे. एकमेकांच्या जीवनात एकमेक शिरली आहेत, अशांना कोणतं पुन्हा लग्न?''

''परंतु अद्याप शांत-काम ती झाली नसतील तर? वेडेवाकडे पाऊल पडण्यापेक्षा संरक्षण म्हणून पुन्हा लग्न करून संयमी जीवनाचा मार्ग पत्करणं श्रेयस्कर नाही का? अतिउच्च ध्येय डोळ्यांसमोर ठेवून पतित होण्यापेक्षा- दरीत पडण्यापेक्षा- मर्यादित ध्येय डोळ्यांसमोर ठेवून थोड्याशा तरी उंचीवर भक्कम पावलं रोवीत जाऊन उभं राहणं योग्य नाही का?''

अशा प्रश्नाला श्रीनिवासराव उत्तर देत, ''तुमचं म्हणणं मला मान्य आहे. ज्यांना तसं राहणं अशक्य वाटत असेल त्यांनी पुन्हा विवाह करावेत. परंतु, प्रथम पत्नीच्या प्रेमाचा या जन्मीच नाही तर जन्मोजन्मी पुरेल इतका सुगंध ज्यांच्या जीवनात भरून राहिला आहे, तो त्या सुगंधाच्या सामर्थ्यानं तरुण जाईल. पतीच्या जीवनातील अमर माधुरी जिनं चाखली असेल, तिला दुसऱ्या संरक्षणाची जरूरी नाही. पतीची पवित्र स्मृती-त्याचं नाव-तिला तारील. तिला समाधान व आनंद देत राहील. मिनीची आई माझ्या जीवनात भरून राहिली आहे. ती मेली असे मला जणू वाटत नाही. जिवंतपणी ती माझी होती, त्यापेक्षाही अनंतपटीनं आज ती माझी झाली आहे. जिवंतपणी आमच्या प्रेमैक्यात थोडा तरी पार्थिवतेचा अंश होता. परंतु, आज केवळ चिन्मय अभंग निर्मळ नाते जोडलेले आहे. माझे हृदय फाडून दाखविता आलं असतं, तिर तिथे मिनीची आई प्रेमवीणा वाजवीत बसलेली तुम्हाला दिसली असती.''

श्रीनिवासराव असे बोलत व शेवटी त्यांचा गळा भरून येई. डोळे भरून येत. ती चर्चा त्यांना असह्य होई. ते पटकन् उठून जात व शयनमंदिरातील मिनीच्या आईच्या तसबिरीसमोर थरथरत उभे राहत. क्षणभर तेथे बसत. रडवेला चेहरा पुन्हा प्रफुल्लित होई. जणू अमृतरस मिळे त्यांना.

लग्न करा असे श्रीनिवासरावांस पुन्हा कधी कोणी बोलले नाही. परंतु श्रीनिवासरावांची इस्टेट? मिनीचे लग्न करून का कोणाला घरजावई करणार व त्याला साऱ्या इस्टेटीचे बक्षीसपत्र देणार? का कोणाला दत्तक घेणार? दत्तक घेण्यासंबंधी सूचना त्यांच्या कानावर येत. परंतु, ते लक्ष देत नसत. एकदा तर ते म्हणाले, ''एखादा मुलगा दत्तक घेण्यापेक्षा एखाद्या संस्थेला सारी इस्टेट का देऊ नये? एकदा एक मिशनरी म्हणाला होता, ''आमच्याकडे दत्तकपद्धती नाही, म्हणून कोट्यवधी फंड आमच्या संस्थांना मिळू शकतो.'' परंतु आमच्याकडे हे दत्तकाचे खूळ आहे. परंपरा चालविणे पवित्र खरे, परंतु काळवेळही पाहिला पाहिजे. आज देशाच्या कल्याणासाठी झटणाऱ्या



शेकडो संस्था उभ्या राहत आहेत. या देशाचा फाटका संसार सुधारण्यासाठी त्या खटपट करीत आहेत. त्या संस्था मरू देणे म्हणजे पूज्य पूर्वजांशीही द्रोह आहे. पूर्वजांची परंपरा चालविण्यासाठी आधी देश जगला पाहिजे आणि म्हणून त्या देशाला जगवू पाहणाऱ्या संस्था जगविल्या पाहिजेत. खादी संघ, हरिजनसेवक संघ, हिंदी-प्रचार-समिती, गोरक्षण, व्यायामप्रसार, साक्षरताप्रसार, शेकडो संस्था आहेत; कोणाला आहे त्याची पदोपदी आठवण? माझी इस्टेट मी तिथे का देऊ नये? आणि ही इस्टेट माझी तरी कशी? काय माझा अधिकार? ही शेतभाते कोणाची? शेतकऱ्यांची; ती त्यांना मी का देऊ नयेत? ज्यांना जमीन नाही अशा हरिजनांना ती का देऊ नयेत? माझे, काय आहे माझे? संपत्ती गादीवर लोळून निर्माण करता येत नसते.''

''व्यापारी हजाराचे दहा हजार, लाखाचे दहा लाख गादीवर बसून करतात. आम्हाला दिसतं.'' कोणी म्हणत.

परंतु, श्रीनिवासराव सांगत ''ते लाखाचे दहा लाख करीत असतील. परंतु त्याचा अर्थ काय? दुसऱ्याच्या खिशातील दहा लाख त्यांनी कमी केले. जगातील संपत्तीत त्यांनी भर घातली का? संपत्ती त्यांच्या वहीत होती. ती यांच्या वहीत आली. एखाद्या शेटजीला एक गिरणी उभारून तेथे बसू दे. ते एक धुराचे नळकांडे करू दे सुरू, गिरणीत नऊ-नऊ तास काम करून मरणारे कामगार तिथे नसतील तर संपत्ती होईल का निर्माण? शेतात श्रमून-राबून शेतकरी कापूस, शेंगा, धान्य न निर्मिल तर व्यापारी गाद्यांवर बसून भाव करीत बसले तरी का संपत्ती तिजोरीत येणार आहे? संपत्ती श्रमातून निर्माण होते. ती श्रम करणाऱ्याजवळ राहत नाही. ती लुबाडली जाते, अन्यत्र नेली जाते, ते श्रमणारे उपाशी राहतात. खरोखरीच ही माझी इस्टेट म्हणायला मला लाज वाटते. एखादे वेळेस हा मोठा सुंदर वाडा मला लाखो जीवांच्या संसाराची होळी करून बांधला आहे असं वाटतं. क्षणात हे सारं वैभव भिरकावून द्यावं असं वाटतं. परंतु मोह आहे. मोह तोडणं महाकर्म कठीण!''

एखादा मृत्युंजय शिवशंकरच, वैराग्याचे भस्म अंगाला फासलेला, ज्ञानगंगा ज्याच्या मस्तकातून स्रवत आहे, शीलाचा चंद्रमा ज्याच्या भाळी मिरवत आहे, पवित्र निश्चयाचा तिसरा डोळा ज्याचा उघडलेला आहे, असा तो योगियांचा राणाच श्रीनिवासांच्या रूपाने बोलत आहे असे त्या वेळेस वाटे. त्यांच्या डोळ्यांत त्या वेळेस

एक अशा प्रकारचे तेज चमके की, दुसऱ्यांच्या जीवनास थोडेफार तरी पेटविल्याशिवाय राहत नसे.

श्रीनिवासरावांच्या हृदयाचा थांग लागणे कठीण. त्यांना मिनीचे बंधन नसते तर ते केव्हाच हिमालयात गेले असते. लाकडे पोखरणाऱ्या भ्रमराला एक कोमल कमळ गुंतवून ठेवते, पकडून ठेवते, कोंडून ठेवते. मिनीची ती जीवनकळी, त्या कलिकेसाठी श्रीनिवासराव जगत होते. ते मिनीची सारे करायचे. मिनीची सेवा करताना त्यांना धन्य वाटे. मातृप्रेम व पितृप्रेम या दोहोंचा आनंद ते मिनीला देत. ''मिने, मी तुझे केस विंचरतो. त्यात फूल खोवतो.'' ते म्हणावयाचे. मीना गोड हसे, ''मिने, तुला भरवू? मोठी झाली म्हणून काय झालं? देऊ का तुला भात कालवून?'' असे म्हणायचे. मिनी गोड हसे.

मिनीसाठी किती खेळ, किती प्रकार! सारे जग आपल्या मिनीसाठी आहे असे श्रीनिवासरावांना वाटे. मीना घोड्यावर बसायला शिकली होती. तिच्यासाठी एक सुंदर घोडा घेण्यात आला होता. तिची सायकल होती. मोटार हाकायलासुद्धा ती शिकली होती. श्रीनिवासराव मिनीबरोबर कॅरम खेळत, सागरगोटे खेळत, बॅडमिंटन खेळत. मिनीबरोबर फिरायला जात, सिनेमाला जात; ते तेथे झोपी जात व मिनी त्यांना शेवटी ''उठा ना बाबा, संपला सिनेमा.'' असे म्हणून जागे करायची.

मिनी म्हणेल तो दागिना, म्हणेल तो कपडा, म्हणेल ती वस्तू, म्हणेल ते चित्र ते आणून देत. मिनीचा शब्द म्हणजे वेदवाक्य. तेथे ते विचारसुद्धा करीत नसत. ते इतरांजवळ वादविवाद करीत, पण मिनीसमोर बुद्धी पळून जाई. विचार मावळे. मिनीजवळ ते केवळ मिनीचे होत.

मिनी घरात शिके. तिला शिकविण्यासाठी एक वृद्ध पेन्शनर येत असत. घरात नाना मतांची नाना वर्तमानपत्रे येत. नाना मासिके येत. सुंदर ग्रंथालय होते. नवीन नवीन पुस्तके घरी येत. मिनी हे चाखी, सारे प्राशी, ती आपल्या शिक्षकाजवळ वाद करी, पित्याजवळ वाद करी. परंतु श्रीनिवासराव नुसते हसत. मग मिनी चिडे व म्हणे, ''मी इतकं बोलते, परंतु तुम्ही काहीच बोलत नाही, बाबा!'' ते उत्तर देत, ''मैनेला बोलू द्यावं, कोकिळेला कुहू करू द्यावं.'' मिना रागाने म्हणे, ''मी मैना नाही, कोकिळा नाही, मी माणूस आहे. विचारासाठी मी भुकेलेली आहे. खरं काय, खोटं काय ते कळण्याची मला उत्कंठा आहे. ही शेकडो वर्तमानपत्रं, ही शेकडो मतं, सत्य कोणतं, बाबा?''



''तुला आपोआप समजेल. सत्य आपल्या हृदयाला समजत असतं. वादविवाद करणारी बुद्धी, आतील सत्याचा आवाज आवडत नाही म्हणून बाहेर भटक्या मारू इच्छिते.'' पिता म्हणे.

पित्याचे शब्द ऐकून मिनी मुकी होई.

एके दिवशी श्रीनिवासराव व मिनी मोटारीतून दूर फिरावयास गेली होती. कधी कधी मिनीला अशी हुक्की येत असे. ती म्हणायची, ''बाबा, मोटारीत बसावं व सारखं हिंडत राहावं असं मला वाटतं. सारं जग बघावं, त्रिभुवन धुंडाळावं.'' श्रीनिवासराव हसून म्हणावयाचे, ''त्रिभुवनात काय धुंडाळायचं?'' मिनी म्हणे, ''ते मला काय माहीत? सहज हिंडावं असंच वाटतं. निर्हेतुक जगत्संचार!''

त्या दिवशी एकदम पहाटे ती उठली. तिने वडिलांस उठविले. बाहेर गार वारा वाहत होता. आकाशात तारे थरथरत होते. परंतु मिनीला थंडी नाही, काही नाही.

''बाबा, तुम्ही हे पांघरूण घ्या हं. तुम्हाला थंडी लागेल.'' मिनी म्हणाली.

''आणि तुला गं? ते म्हणाले.

''मला आज थंडी नाही वाजत. आज माझ्या अंगात ऊब आहे. जणू उकडतं आहे.'' ती म्हणाली.

''ताप तर नाही ना आला?'' तिच्या हाताला हात लावून श्रीनिवासरावांनी विचारले.

''छे:! ताप नाही, काही नाही. बागेतील फुलांचा कसा गोड वास येतो आहे! आजच असा येत आहे की रोज येतो बाबा?'' तिने विचारले.

''रोज येतो. परंतु आपण खिडक्या लावून झोपतो. सुगंधी फुलांच्या वासाचं गोड ओझं घेऊन ओथंबलेला वारा आपल्या दाराशी तिष्ठत उभा असतो.'' ते म्हणाले.

'मोटार जात होती आणि पुढे दाट धुके, रस्ता दिसेना. किती दाट धुके! असे कोणी पाहिले नसेल.

''मिने, गाडी थांबव. धुक्याचा जणू पाऊस पडत आहे.'' पिता म्हणाला.

''धुक्यातून मला दिसतं आहे. खरंच दिसतं आहे.'' ती म्हणाली.

''मिने, थट्टा नको. गाडी खळग्यात जाईल. झाडावर आपटेल.'' ते म्हणाले.

''देवाची इच्छा असेल तसे होईल. तो बघा आकाशात एकच तारा दिसत आहे. बाकी काही दिसत नाही. तो बघा बाबा. दिसला? हे काय? दिसत नाहीसा